# वसई विरार शहर ई–वार्ता

## साथीचे आजार रोखण्यासाठी वसई विरार शहर महानगरपालिकेची जनजागृती मोहिम

वसई विरार शहरात पसरत असलेल्या साथीच्या आजाराला रोखण्यासाठी वसई विरार शहर महानगरपालिकेत असलेल्या आरोग्य विभागतील कर्मचारी घरोघरी जाऊन तपासणी करत आहेत. शहरात भित्तीपत्रके लावून आणि व्याख्याने देऊन जनजागृती केली जात आहे.









वसईत चालू वर्षात डेंग्यू आणि स्वाईन फ्लूची साथ पसरली आहे. चालू वर्षात स्वाईन फ्लूमुळे पाच आणि डेंग्यूमुळे दोघांचा बळी गेला आहे. यासाठी पालिकेच्या आरोग्य विभागाने जोरदार मोहीम सुरु केली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत साथीचे आजार होणा–या रुग्णांचे प्रमाण ५० टक्यांनी कमी झाले असून आम्ही ते पूर्ण आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करत आहोत. हे आजार कशामुळे पसरतात, त्याची लक्षणे काय आणि काय काळजी घ्यावी याची माहिती देणारे भित्तीपत्रके जागोजागी लावण्यास सुरुवात केली आहे. अनेक ठीकाणी नाल्यातून जाणा–या जलवाहिन्यांमुळे पाणी दुषित होते. त्याबद्दल सबंधित विभागाची कार्यवाही चालू आहे. विविध आजारांबाबत जनजागृती करण्यासाठी या वर्षी १६ हजार शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आरोग्याची व्याख्याने देण्याचे काम सुरु आहे. तसेच अनेक ठिकाणी पावडर आणि औषध फवारणी करून रस्ते सुव्यवस्थित केले आहेत.

वसई विरार शहर
ई-वार्ता

## रस्त्यांचे सुशोभीकरण

वसई–विरार शहर महानगरपालिकेत रस्ते सुस्थितीत करून त्यावर रीफ्लेक्टर पट्टे, झेब्रा क्रॉसिंग स्पीड ब्रेकारांना पट्टे मारून सुशोभित करायचे आदेश मा. श्री सतीश लोखंडे यांनी दिलेले होते. तसेच रस्त्या लगतचे फुटपाथ कर्ब स्टोन, पेव्हर ब्लॉक लावून सुस्थितीत करण्याचे श्री मा. आयुक्त यांनी निर्देश दिले होते.









त्या अनुषंगाने प्रथम टप्यात राष्ट्रीय महामार्गाकडून शहरात येणाऱ्या रस्त्यांवर डिव्हायडर लावून पेंटिंग करणे, स्पीड ब्रेकर, झेब्रा क्रॉसिंग रंगविणे, विभाजकांमध्ये शोभिवंते वृक्षाची लागवड करणे इत्यादी कामे हाती घेण्यात आलेली आहेत. त्याकालावधीत झालेल्या मॅरेथॉन स्पर्धेवेळी सुमारे 60 km लांबीचे रस्ते सुस्थितीत करून रस्त्यांना पट्टे मारणे, दुभाजक रंगविणे, झाडे व इलेक्ट्रिक पोल सहा फुटापर्यंत रंगविणे वैगरे कामे सर्व प्रभागात सुरु करण्यात आलेली आहेत.

# वसई विरार शहर
# ई-वार्ता



तद्नंतर त्याचबरोबरीने शहरातील इतर प्रभागातील रस्त्यांवरील अतिक्रमणे काढून फुटपाथ दुरुस्ती करणे पेवर ब्लॉक बसविणे वैगेरे कामे सर्व प्रभागात सुरु करण्यात आली आहेत. टप्प्या टप्प्यांने संपूर्ण शहर सुशोभित करून व आवश्यक त्या वृक्षाची लागवड करून शहर सुशोभित करण्याचे आदेश मा. आयुक्त श्री. सतीश लोखंडे ह्यांनी दिले आहेत.

# वसई विरार शहर ई-वार्ता

## अनधिकृत बांधकामांवर महानगरपालिकेची कारवाई



प्रभाग समिती (एफ)
१) १२३ रूम,
२) ५८ गाळे
३) जोते २०४
४) R-C-C तळमजला+४ अशा २ इमारत
५) R-C-C तळमजला+३ अशा २ इमारत
६) पर्त्याचे शेड ३४
७) १२ हातगाड्या
८) ९ टप–या



प्रभाग समिती (डि)
१) R-C-C तळमजला+१ अशा २ इमारत
२) R-C-C तळमजला+४ अशा ४ इमारत
३) गाळे ४,
४) जोते ५
५) २२ टपरी
६) ४७ हातगाड्या

वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (एफ) धानिव/पेल्हार हद्दीतील दि. ०१/१२/२०१५ ते २८/१२/२०१५ पर्यंत १२३ रूम, ५८ गाळे तसेच R-C-C तळमजला+४ अशा २ इमारत व R-C-C तळमजला+३ अशा २ इमारत इ. अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आलेली आहेत. तसेच जोते २०४, पर्त्याचे शेड ३४, १२ हातगाड्या व ९ टप–या निष्कासित करण्यात आल्या आहेत.

वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (डि) नालासोपारा (पुर्व) हद्दीतील दि. ०१/१२/२०१५ ते २८/१२/२०१५ पर्यंत R-C-C तळमजला+१ अशा २ इमारत व R-C-C तळमजला+४ अशा २ इमारत तसेच ४ गाळे, जोते ५ अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आलली आहेत. तसेच फुटपाथवर असलेल्या २२ टपरी व ४७ हातगाड्या निष्कासित करण्यात आल्या आहेत.





# वसई विरार शहर ई–वार्ता

## २६ वा वसई तालुका कला क्रीडा महोत्सव






दिनांक २६/१२/२०१५ रोजी क्रीडा ज्योत प्रज्वलीत करून २६ व्या वसई तालुका कला क्रीडा महोत्सवाची सुरवात झाली. सदर क्रीडा ज्योत विरार पूर्व विर सावरकर पुतळ्याकडून वसई चिमाजी आप्पा मैदान येथे आणून प्रज्वलीत करण्यात आली. २६ वा वसई तालुका कला क्रीडा महोत्सवामध्ये आज दि.२९/१२/२०१५ पर्यंत झालेल्या स्पर्धांचे छायाचित्र (फोटो)

मशाल यात्रेचे फोटो








# वसई विरार शहर
# ई-वार्ता

## ★ नागरिकांसाठी आवाहन ★

देशात स्वच्छ भारत अभियान सर्वत्र राबवण्यात येत आहे. याच धर्तीवर वसई-विरार शहर हे सुंदर व स्वच्छ ठेवावे.

★ केरकचरा फक्त कचरा कुंडीतच टाकावा,

★ सार्वजनिक ठिकाणी गुटखा, तंबाखू खाऊन थुंकू नये,

★ सार्वजनिक जागेत मलमूत्र विसर्जित करू नये,

★ बाजारात जाताना कापडी पिशव्यांचा वापर करावा,

★ शहर व ग्रामीण भागातील पर्यावरण संवर्धनासाठी जास्तीत जास्त वृक्ष तोड न करता अधिका-अधिक वृक्ष लावून संवर्धन करावे.

★ दरम्यान आपले शहर स्वच्छ ठेवावे.







धन्यवाद
वसई विरार शहर महानगरपालिका